उद्यान कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- उकाजा/१७८५
दिनांक :- १०/७/२६

## दरपत्रक चौकशी

प्रति,

------------------------

------------------------

विषय:- राजीव गांधी प्राणीसंग्रहालयातील मांसभक्षक वन्यप्राण्यांच्या खाद्यासाठी म्हैसवर्गीय प्राण्यांचे मांस (बीफ)(फक्त मांडी) पुरवठा करणे या कामाकरिता दरपत्रक सादर करणेबाबत.

महोदय,

पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी प्राणीसंग्रहालयातील मांसभक्षक वन्यप्राण्यांच्या खाद्यासाठी म्हैसवर्गीय प्राण्यांचे मांस (बीफ)(फक्त मांडी) पुरवठा करणे या कामाकरिता खाली दिलेल्या अटी व शर्तीनुसार दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मालाचे नाव | दैनंदिन मागणी | एकूण वार्षिक मागणी (२६१ दिवसांकरिता) |
|---|---|---|---|
| १. | म्हैसवर्गीय प्राण्यांचे मांस (बीफ) (फक्त मांडी) | ६० किलो | १५,६६० किलो |

१) वरील यादीतील मालाचे दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे सर्व करांसहीत असणे आवश्यक आहे.

२) प्राणीसंग्रहालयातील मांसभक्षक वन्यप्राण्यांच्या खाद्यासाठी म्हैसवर्गीय प्राण्यांचे मांस (बीफ)(फक्त मांडी) पुरवठा करणे या कामाकरिता अंदाजित रक्कम काढण्याकरिता दरपत्रक मोहर बंद पाकिटात सादर करणे आवश्यक आहे. सदर पाकीटावर जावक क्रमांक नमूद करावा. ई-मेलद्वारे सादर केलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.

३) सदर दर फक्त म्हैसवर्गीय प्राण्यांच्या मांडीच्या मांसासाठी असून पुरविले जाणारे मांस हे फक्त संपूर्ण मांडीचे (मागील पाय) असावे. मांडीच्या हाडा व्यतिरिक्त पाठीचा मणका अथवा अन्य हाडे स्विकारली जाणार नाहीत हे विचारात घेऊन द्यावेत.

४) दैनंदिन पुरविले जाणारे बीफ किचन विभागामध्ये वजन करून जागेवर कापून द्यावे लागेल.

५) प्राण्यांनी खाऊन शिल्लक राहिलेले बीफ दुसऱ्या दिवशी ठेकेदाराने घेवून जावे लागेल.

६) सदर मालाचा पुरवठा सकाळी ०९:३० वाजता राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे करावा लागेल.

७) पुरवठा करताना माल निकृष्ठ असल्यास ठेकेदारास तो त्याच दिवशी बदलून द्यावा लागेल.

८) निविदेमधील परिमाण अंदाजे असून जेवढा माल लागेल तेवढाच घेतला जाईल.

९) सदरचे दरपत्रक मा.सह महापालिका आयुक्त, उद्यान विभाग, पुणे महानगरपालिका यांच्या नावाने मोहरबंद पाकिटात उद्यान कार्यालय, छत्रपती संभाजीराजे उद्यान, जंगली महाराज रस्ता, शिवाजीनगर, पुणे-०५ येथे सादर करावेत.

१०) दरपत्रक सादर करण्याची शेवटची तारीख ३ / ८ /२०२६ व वेळ ०२.३० वाजेपर्यंत आहे. नियोजित तारखेनंतर आणि वेळेनंतर प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

११) दरपत्रकात सादर केलेले दर निविदा संपुष्टात येईपर्यंत एकसारखे राहतील.

१२) प्रस्तुत कामासाठी खालीलपैकी एक अनुभवाची अट आवश्यक आहे.

अ) निविदादारास शासकीय व निम शासकीय विषयांकित कामकाजाचा अनुभव.

आ) केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधीकरण मान्यताप्राप्त प्राणीसंग्रहालये, शासकीय/निमशासकीय संस्था यांना समाधानकारक माल पुरवठा करण्याचा अनुभव अथवा माल पुरवठा करणेबाबत खाजगी व्यवसायाचा तीन वर्षाचा अनुभव.

इ) निविदादार राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे मालाचा पुरवठा करत असल्यास / केला असल्यास त्याच्या पुरवठा कालावधीतील त्याने सर्वात शेवटी समाधानकारक माल पुरवठा केलेबाबतचा अनुभवाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

१३) कोणतेही कारण न देता कोणतेही किंवा सर्व दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे राखीव आहे.

१४) सदर दरपत्रकात सादर केले जाणारे दर बाजारभावाशी सुसंगत असले पाहिजे अन्यथा वाढीव दर ग्राह्य धरले जाणार नाहीत.

संतोष टिळेकर
वरिष्ठ लिपिक
राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

मनोज जाधव
लाईव्हस्टॉक सुपरवायझर
राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

डॉ.सुचित्रा सूर्यवंशीपाटील
उप संचालक
राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

डॉ.राजकुमार जाधव
संचालक
राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

डॉ.अशोक दि.घोरपडे
सह महापालिका आयुक्त
उद्यान विभाग
पुणे महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner